२४२६१।६४

कायम विना अनुदान
इंग्रजी माध्यम
इ. ८ वी सह ९ वी/ १० वी च्या वर्गास जून -२००९ पासून परवानगी

जा.क्र.माध्य. /३/१२/२/नमाशा /पुवि /२००९-१०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१
यांचे कार्यालय
दिनांक : 5 OCT 2009

प्रति

सचिव,
वसंत सणस एज्यु. सोसा. स. नं. ३५ वडगांव खुर्द,
ता. हवेली, जि. पुणे

विषय :- सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत. .

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. नमाशा-२००९/(१५२/२००९)/माशि-१, दि. २७ जुलै, २००९
२) या कार्यालयाचे जा.क्र. माध्य. ३/१२/नमाशा /पुवि/ २००९-१० दिनांक २७ / ८ / २००९
३) शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. यांचे पत्र क्र. शिक्षण/माध्य/पुमापु/२२४/०९
दिनांक २४/९/२००९

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खालील दर्शविलेल्या ठिकाणी इ. व माध्यमातून जून २००९ पासून कायम विनाअनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा संहितेनुसार. आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | वसंत सणस एज्यु. सोसा. स. नं. ३५ वडगांव खुर्द, ता. हवेली, जि. पुणे | ग्रीन एकर्स-इंग्लिश मिडीयम स्कूल, वडगांव खुर्द, ता. हवेली, जि. पुणे | आठवी, नववी व दहावी (तिनही वर्ग) | इंग्रजी |

**कायम विना अनुदान**

१) आपल्या संस्थेस वर नमूद केलेल्या ठिकाणी नविन माध्यमिक शाळेस इंग्रजी माध्यमासाठी कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२) शासनाच्या पूर्व परवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३) **"कायम विनाअनुदान तत्वावर मिळालेली शाळा"** असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे.

४) सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने / शाळेने संबंधित अधिकाऱ्यांशी / शासनाशी पत्रव्यवहार करतांना **"कायम विनाअनुदानित शाळा"** अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

५) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे उदा. विद्यार्थ्यांचे फीबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकरक असणे आवश्यक आहे.

७) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्ट्या मागालेल्या विद्यार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

८) जादा उघडण्यात आलेल्या तुकडयातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येऊ नये.

९) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपीटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येऊ नये.

१०) माध्यमिक शाळा संहिता व खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

११) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.-एसएसएन २१०३/(५०/०३)/माशि-२, दि. २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.

१२) संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्ती करण्यात येईल.

१३) शिक्षक / कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करुन देण्यांत येईल.

१४) माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यांत येईल.

१५) शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यात येतील.

१६) माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये कार्यबळ गट समिती सभेच्या पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

१७) माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ (१७) अन्वये शाळेत पालक-शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.

(कृ. मा. प.)

इतर अटी :-

१) संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३) सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखादी शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबीत नाही.

५) सदर संस्थांमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

वरील बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरुद्धात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात यावे.

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ अनुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पद्धती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

(बाळासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता

स्थळ प्रत मा. शिउसं यांनी मान्य केली आहे.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी

**१) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.**

त्यांना वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देऊन पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा. तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहारांची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्याविषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

**२) मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.**

**३) मा. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर.**

**४) निवड नस्ती**

तातडीचे
कायम विना अनुदान
परवानगी वर्ष [२००९-१०]

२१४८८। ८७

जा.क्र.माध्य.३/१२/नाशाळा/पुवि/२००९-१०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : / /१०
27 AUG 2009

प्रति,
सचिव
वसंतराव सणस एज्यु. सोसा. स.नं. ३५
वडगांव बुर्द, ता-हवेली, जि-पुणे.

विषय :- २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत . . .

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-नमाशा/२००९/(१५२/२००९)/माशि-१, दिनांक-२७ जुलै, २००९.

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | वसंतराव सणस एज्यु. सोसा. स.नं. ३५ वडगांवबुर्द ता-हवेली, जि-पुणे. | वडगांव बुर्द, ता-हवेली जिल्हा पुणे. | आठवी | इंग्रजी |

**कायम विना अनुदान**

आपल्या शाळेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

१. आपल्या संस्थेस वर नमुद केलेल्या ठिकाणी नविन माध्यमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
२. सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे..
३. शासनाच्या पुर्व परवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.
४. आपण आपल्या संस्थेच्या अध्यक्षांचे सदरची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र (रु.१००/- च्या स्टँप पेपरवरील) आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे सादर करावे.
५. आपल्या संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
६. "कायम विनाअनुदान तत्वावर मिळालेली शाळा असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे.
७. सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने/शाळेने संबंधित अधिकाऱ्यांशी/शासनाशी पत्रव्यवहार करतांना "कायम विनाअनुदानित शाळा अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.
८. आपली संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १९६० अगर केवळ मुंबई सार्वजनीक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
९. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
१०. सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
११. सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी नाहीत तसेच सदर संस्थेची एखादी शाळा शासनाने ताब्यात घेण्याचे प्रकरण प्रलंबीत नाही.
१२. सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.
सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १२ विहित बाबींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसांचे आत आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे.
१३. शासन निर्णय, दि.१९ ऑक्टोबर, २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्यांच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील, अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत असे गृहित धरले जाईल.
१४. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक-एसएसएन २१०३/(५०/०३)/माशि-२, दि.२७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.

[illegible]
[illegible]

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१ करिता.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे.
२. आपण संबंधित संस्थेची अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

प्रत :३. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर
४. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना सविनय सादर

Sandeep/samashal.1

२५९६९६५

परवानगी वर्ष : २००९-१०
माध्यम : इंग्रजी
कायम विना अनुदान

जा.क्र. माध्य.३(१२)/प्रथम मान्यता/पुवि/२००९-१०
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 12 OCT 2009

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद पुणे.

विषय : प्रथम मान्यता. . इ. ८ वीच्या वर्गास जून ०९ पासून

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक- जिप/माध्य/८/नमाशा/प्रमा/३१९०/०९ दि. ८/१०/०९
२. शा.प.क्र. नमाशा- २००९/[१५२/२००९]/माशि-१ दि. २७/७/०९
३. कार्यालयाचे पत्र क्र. माध्य-३/१२/२/नमाशा/पुवि/०९-१० दि. ५/१०/०९

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये वसंतराव सणस ए. सो. स. नं. ३५ वडगांव बुर्द संस्थेच्या ग्रीन एकर्स इंग्लिश मिडीयम स्कुल, वडगांव बुर्द, ता-हवेली माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २००९-२०१० या शैक्षणिक वर्षासाठी जून २००९ पासून कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्ततेस अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे ? याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी..
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी..
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी..
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी..
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे..
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी..
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत..
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात..
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे..
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत..
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी..
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी..
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी..
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी..

(कृपया मागे

१६. विद्यार्थी संख्या वाढवावी..

१७. जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी..

१. शाळांमध्ये सहा महिन्यांच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३. शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे..

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी / कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी..

संदर्भ- १. शासन पत्र क्रमांक-याचिका-२००९/प्र.क्र.२४४/प्राशि-४/ दि.१९ सप्टेंबर, २००९.

२. संचालनालयाचे पत्र क्र.संकीर्ण-२००९/६४११६/याचिका/१५ क(८) ९३४४, दि.२४ सप्टेंबर, २००९.

[illegible] विभाग उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे

(बाळासाहेब [illegible])
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी

१. मुख्याध्यापक,
ग्रीन एकर्स इंग्लिश मिडीयम स्कुल, वडगांव बुर्द्रु,
ता-हवेली, जि-पुणे.

२. निवडनस्ती